## दीपस्तंभ

दीपस्तंभ उभा सागर किनारी
पांडुरंग उभा तसा विटेवरी ||धृ.||

धडके न नौका खडका अंधारी
म्हणून जळतो दीप रातभरी
तसे मानवे न जावे वाममार्गी
म्हणून खुणावी हरी आयुभरी ||१||

तमा न दीपस्तंभा कोण नौकेत
देई प्रकाश न पाही धर्म जात
तसा विठू माझा भेद न करीत
रक्षितो हरेका शरण जो येत ||२||

– नारायण
०९/०९/२३